(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE-CCXXV (225)

## Domestic Violence: Impact on Indian Society




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

Guest Editor:
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

| | | |
|---|---|---|
| 131 | नौकरी करणा—या स्त्रियांची मानसिक स्थिती व आरोग्य<br>प्रा.डॉ.स्मिता गजभिये | 563 |
| 132 | घरेलू हिंसा एवं महिला लैगिक उत्पीड़न<br>Smt. Seema Khare /Surendra Prasad Sahu | 567 |
| 133 | भारतीय स्त्रिया आणि घरगुती हिंसाचार कायदा डॉ. कल्पना शिंदे | 572 |
| 134 | सामाजिक स्वास्थ्य में संगीत की भूमिका प्रा. अनिता शर्मा | 577 |
| 135 | साठोत्तरी हिंदी उपन्यासों में घरेलू हिंसा : कल और आज<br>प्रा.डॉ. कदम एस.एस. | 580 |
| 136 | घरेलू हिंसा मे कमी लाने मे घरेलू हिंसा से महिलाओं के संरक्षण का अधिनियम, २००५ की भूमिका का अध्ययन संजय कुमार जांगड़े | 584 |
| 137 | कौटुंबिक हिंसाचार : आर्थिक पैलूंच्या संदर्भात विवेचन वैभव अर्मळ | 586 |
| 138 | सामाजिकदृष्ट्या स्त्रियांवर होणाऱ्या घरगुती हिंसाचाराच्या सध्यस्थितीचा अभ्यास डॉ. मनीषा पी. इंगळकर | 588 |
| 139 | भारत में महिलाओं के प्रति घरेलू हिंसा रोकथाम के उपाय<br>श्री॰ रोशन तुलसीराम गजबे | 591 |
| 140 | नोकरी करणा—या महिलांच्या किशोरवयीन मुलांच्या समस्या<br>डॉ.रोहिणी दि.मेश्राम | 594 |
| 141 | कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येचे वास्तवडॉ. श्रीनिवास नरहरी पिलगुलवार | 599 |
| 142 | कौटुंबिक हिंसाचार, प्रतिबंधक कायदे व उपाययोजना<br>प्रा.डॉ. वंदना ह. तागडे /प्रा.डॉ. गोपीचंद वाय. कठाणे | 609 |
| 143 | आधुनिक काळातील महिलांवरील हिसांचाराच्या समस्यांचे बदलते स्वरूप<br>प्रा.डॉ.व्हि.एन.कन्नाके. | 613 |
| 144 | वऱ्हाड प्रातांतील प्राचीन राजवंश डॉ. गजेन्द्र भा. ढवळे | 618 |
| 145 | महिला अत्याचारावर विचारवंतांची भूमिका . एक सामाजिक अध्ययन<br>प्रा.डॉ. पी.एन. वाघ | 627 |
| 146 | 'पारिवारीक अत्याचार व महिला स्वास्थ्य'<br>प्रा. सौ. संगमित्रा दि. कोलारकर | 635 |
| 147 | म. ज्योतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार<br>प्रा. डॉ. संजय गोरे | 640 |
| 148 | पुरूषी मानसिकतेच्या छळातून स्त्रिहिंसा प्रा. डॉ. राजेंद्र जनार्दन कांबळे, | 643 |

**B.Aadhar** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

# वऱ्हाड प्रातांतील प्राचीन राजवंश

डॉ. गजेन्द्र भा. ढवळे
इतिहास विभाग प्रमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा

**प्रस्तावना:**

प्राचीन काळात विदर्भात मौर्य, सातवाहन, मुंड, वाकाटक, राष्ट्रकुट, चाल्युक्य, यादव या प्रमुख व बलाढय राजघराण्यांनी राज्य केले. त्यात एलिचपूर हे त्यांचे महत्वाचे ठिकाण होते. वरील काही राजघराण्यानी आपली राजधानी एलिचपूर येथे ठेवली होती. उत्तर चाल्यूक्याच्या काळात ईल हा जैन राजा होऊन गेला. तो उत्तर चाल्यूक्याचा मांडलिक असावा. त्याच्या काळात विदर्भात जैन संस्कृतीचा प्रचार मोठया प्रमाणात झाला. शिवाय शिरपूर, मूक्तागिरी कारंजा इ.जैन तिर्थक्षेत्रे निर्माण करण्यात आली. पूर्वी एलिचपूर येथे ईल राजाची आणि दुल्हा रहिमशहाच्या लढाईचा वृत्तांत फारसी ग्रंथामध्ये आढळून येतो. त्याच्या वंशाची अधिक माहिती मिळू शकत नाही. परंतू त्यावर आधारीत दुल्हा रहिमानशहा ची कबर, गंज–ए–शहिदा, या वास्तू त्याची साक्ष देतात. त्यानंतर मध्ययुगात कल्याणीच्या चालुक्याच्या दुर्बलतेचा फायदा घेउन भिल्लम यादवाने देवगिरीस स्वतंत्र राज्य स्थापन केले. तेव्हा त्याच्या वऱ्हाड प्रांतांची राजधानी एलिचपूर येथे होती. तेथूनच प्रथमच एकजीव मराठी संस्कृतीचा ध्वज फडकविला आणि मराठी भाषेस प्रतिष्ठा प्राप्त झाली. याच काळात महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी होवून गेले. त्यामुळे इ.स.१२६८ मधील लीळाचरित्र व अन्य धार्मिक वाड़मय हा मराठी भाषेचा अनमोल ठेवा ठरला. एवढेच नव्हे तर मध्ययुगीन कालखंडातील वऱ्हाडातील राजकीय, सामाजिक, धार्मिक लोकजीवनावर प्रकाश टाकणारे इतिहासाचे उपयूक्त आणि महत्वपूर्ण साहित्यीक साधन ठरले.

**मौर्य घराणे**

विदर्भात म्हणजेच वऱ्हाडात मौर्य घराण्याची सत्ता होती हे आपल्याला देवटक येथे जो शिलालेख सापडला त्यावरुन दिसून येते.[१] तसेच भांदक, वेरुळ, अंजिठा येथील लेण्यामध्ये बुध्द मुर्ती आहेत. म्हणजेच बुध्द धर्माचा प्रसार वऱ्हाडात झाला होता. याची साक्ष पटते. त्यावेळी सम्राट अशोकाचा धर्म महामात्र नावाचा अधिकारी या प्रदेशात राज्य करीत होता.[२] आकोला जिल्हयातील लातूर व भंडारा जिल्हयातील पौनी येथिल बौध्द लेणी व स्तूप दिसून आलेत. अशोकाच्या साम्राज्याचा महाराष्ट्र म्हणजे तत्कालीन विदर्भ किंवा वऱ्हाड होय. असे कोकणात उपलबध झालेलया सोपारा येथील त्यशच्या प्रस्तर लेखावरून अनुमान करता येते. या बौध्द सम्राटाच्या आमदनीत बौद्ध धर्माचा प्रवेश वऱ्हाडात झाला असावा. हे महावंश या शिलोनच्या पाचव्या शतकातील ग्रंथावरून समजते. कारण धर्मरक्षित या धर्मोउपदेशकाने कोकंणात आणि महाधर्मरक्षिताने महाराष्ट्रात बौद्ध धर्माच्या प्रचार कार्याला अशोकाच्या काळात प्रारंभ

ISSN : 2278-9308
March 2020

केला असा उल्लेख सदर ग्रंथात आढळतो. त्यावरुन वऱ्हाडात मौर्य घराण्याची सत्ता असावी हे स्पष्ट होते.

सातवाहन घराणे

कालीदास रचित मालविका—अग्नीमित्र या कथानकावरुन यज्ञसेन व माधवसेन यांचा संघर्ष झाला होतां त्यांच्यात समेट होउन वाटणी करुन देण्यात आली. व त्यांची बहिण मालविका व अग्नीमि याच्यांत प्रेम निर्माण झाले होते असे दिसून येते. परंतु यात यज्ञसेन व माधवसेन हे मूळचे कोणत्या राजवंशातील होते याचा उल्लेख कालीदासाने केला नाही. अर्थात हे शुंगाचे मांडलीक राजे असावे पण ते फार काळ टिकले नाही. त्याचवेळी दक्षिणपथ म्हणजेच विदर्भ किंवा वऱ्हाड होय. तेथे आपली सत्ता सिमूख याने स्थापण केली होती.[३] अलीकडे सातवाहन या पुरुषाचे नाव असलेली नाणी सापडली आहेत यावरून सावाहन हाच या राजवंशाचा मूळ पुरुष होय. व त्यावरूनच या घराण्याला त्याचे नाव पडले.(संशोधन मुक्तावली सर २रा पृ६४)याच घराण्याचा साधारणपणे इ.स.पू.२३० च्या सुमारास सातवाहनाची सत्ता स्थापण केली.[४] सिमुकानंतर त्याचा भाऊ कृष्ण त्याने अठरा वर्ष राज्य केले. त्यानंतर श्री सातकर्णी हा सत्तारूढ झाला. याने सम्राटपद घेऊन प्राप्त करून महाराजा झाला. त्याने खारवेलचे आक्रमण दोनदा मोडून काढले. व दोन अश्वमेघ यज्ञ व एकदा राजसूय यज्ञ केला.त्याने बौद्धवर्चस्व प्रस्तापित झाले होते ते नष्ट करून वैदिक धर्माची पूणरुद्धार केला. याच घराण्यात सातकर्णी पहिला याची सत्ता वऱ्हाडात होती. या पराक्रमी राजाचा नायनिका या राणीचा उल्लेख नानेघाट येथील शिलालेखात मिळतो. त्यानंतर दुसरा सातकर्णी हा पराक्रमी राजा होता. त्याने ५६ वर्ष राज्य करून साम्राज्याला दृढता प्राप्त करून दिली. ) त्यावरुन हाल या घराण्यातील सतरावा राजा होय. त्याने गाथा सप्तशती हया ग्रंथाची निर्मिती केली असावी.[५] भंडारा जिल्हातील तऱ्हाळ येथे १६०० नाण्याचा ढीग सापडला होता त्यात गौतमीपूत्र श्रीसातकर्णी तिसरा श्रीपुलूमावी दुसरा श्रीसातकर्णी चौथा शिवश्री पूलूमावी तिसरा इ. सातवहान नाण्याचा अंतर्भव होता.[६]

सातवहान हे महाराष्ट्रीय राजे होते. ते सर्व शिलालेख मराठी भाषेत आहेत त्याचा एकही लेख द्रविडी भाषेत नाही शिवाय हाल सातवाहनाचा गाथासप्तशती हा ग्रंथ महाराष्ट्रीय भाषे मध्ये आहे. या भाषेची सूरूवात वऱ्हाडात झाली. राजशेखरने आपल्या काव्य मिमांसेत, सातवाहन राजा कुतलप्रांती असून तो प्राकृत भाषा बोलतो असा उल्लेख केला आहे.[५] कलिंगराजा खारवेल याने सातकर्णीवर स्वारी केल्याचा उल्लेख हाथीगुंफा येथील शिलालेखात असून त्याने आपले प्रचंड सैन्य पश्चिमेला वैनगंगेच्या काठावर मूषिकनगरपर्यंत पाठवून जय मिळविला असे वर्णन आहे. पुढील वर्षी वऱ्हाड, खानदेश व अहमदनगर या प्रदेशांवर खारवेल ने स्वारी केली तेव्हा त्याचा मोठा विजय झाला. हे सर्वमान्य आहे. हा जैन धर्मिय राजा होता.[६]यावरुन

सातवहानाची सत्ता वऱ्हाडात होती हे सिध्द होते. वऱ्हाड हा पूर्वी विदर्भ प्रांत होता. हा प्रदेश सातवहानांच्या प्रत्यक्ष अधिकारात होता. दक्षिणेत गोदावरी नदीपासून उत्तरेत मालवा आणि पूर्व वऱ्हाड, ऋक्षवंत याचा स्वामी असल्यावे दिसून येते.[७] (महाजन विद्याधर प्राचीन भारत का इतिहास, एस.चन्द. एण्ड कम्पनी लि. रामनगर नई दिल्ली, पृ. ३६७)इ.स. २३० च्या सुमारास सातवहानांच्या सत्तेला ग्रहण लागले होते. आणि त्यावेळी आंध्रप्रदेशावाकाटक व विदर्भात मुंड राजे उदयास आले होते असे दिसते पूढे वाकाटकांची शक्तीत वाढ होवून त्यांनी मुंड वंशाचा उच्छेद केला असावा असे दिसते. आदित्य राजानंतर लवकरच मुंड राजे पदच्युत झाले असावे.

वऱ्हाडातील मुंड वंशिय घराणे—

सम्राट अशोकाच्या मृत्यू नंतर इ.स. पूर्व २३० पासून ते इ.स.२३० पर्यत सातवाहन नृपतीचे दक्षिनेत अर्थात वऱ्हाडात राज्य होते. त्यांच्यानंतर विदर्भात वाकाटक राजांचा उदय होउन ते राज्य करु लागले. असे आजपर्यंत समजण्यात येत होते. पण साधारणपणे १० वर्षापूर्वी अमरावती जिल्हयात एलिचपूर पासून उत्तरेला १० कि.मि.अंतरावर असलेल्या मल्हारा या गावी सापडलेल्या ताम्रपटावरुन दिसून येते की, वाकाटकांच्याही पूर्वी मुंड वंशातील राजे या प्रदेशावर राज्य करीत असावे. राष्ट्र महाराज राजकुल महाराज आदित्यराज हि त्या वंशातील काहि राजांची नावे आढळून येतात. त्याची राजधानी आकोला जिल्हयात वानखेडपूर येथे होती. त्यावरुन हा राजवंश मूळचा वऱ्हाडातील असावा असे दिसते. कारण मल्हारा ताम्रपट वानखेट या ठिकाणवरुन दिला आहे. या वरुन मुंड राजवंश मूळचा वऱ्हाडातील असून एलिचपूर हे त्याचे मूख्य ठिकाण असावे.

वाकाटक घराणे—

वाकाटक घराण्याचा मूळ पुरुष विंद्यशक्ती हा असून त्याने इ.सना च्या तिसऱ्या शतकापासून ते साहाव्या शतकापर्यंत वाकाटक घराण्याचे राज्य वऱ्हाडात होते.[३] पाचव्या शतकात या घराण्यांची सत्ता उत्कर्षाचे पोहचली होती. त्यांचे वऱ्हाडासबंधी जास्त महत्वाचे लेख म्हणजे व शिवणीचे ताम्रपट असून त्याचा उल्लेख येथे स्वतत्रपणे देत आहे.

चम्मक ताम्रपट

सातपुडयाच्या पायथ्याशी वसलेली 'पुरिका' ही प्रथम एकच राजधानी होती.[८] ती अचलपूर असावी. त्या काळात भरभराटीला आलेले शहर असून सातपूडयाच्या पायथ्याशी वसलेले आहे. आजही वाकाटकाळातील मंदिराचे अनेक अवशेष दिसतात त्यावरून वकाटकांची पहिली राजधानीचा मान अचलपूरला जातो. परंतु त्या वंशाच्या पुढे चार शाखा झाल्या तेव्हा नंदिवर्धन इत्यादी वाकाटकाच्या चार राजधान्या बनल्या.

एलिचपूरच्या दक्षिणेस सात मैलावर चम्मक हे गाव चंद्रभागा म्हणजेच मधू नदीच्या काठावर वसलेले आहे. तेथे इ.स. १८६८ मध्ये जमिन नांगरताना एका शेतकऱ्याला ताम्रपट सापडला तो तांब्याच्या जाड तुकडयावर कोरला असून प्रत्येक तुकडा ७१–१–२ इंच लांब व ३१–२ इंच रुंद असा आहे. असे सात तूकडे एका जाड कळीत पक्की ठोकलेली होती. त्यावेळचे एलिचपूर जिल्हयाचे डेप्यूटी कमिश्नर स्पानस्की यांनी मुंबईचे डॉ विल्सन यांच्याकडे पाठविला तेव्हा डॉ भाऊ दाजी त्यांनी त्याचे अक्षर लावून तो छापला तो असा.

"उँ स्वस्ति प्रवरपुरात –––––––वाकाटकांना परममाहेश्वर महाराज
श्री प्रवरसेनस्य वचनात ––––––– भोजकटराज्ये मधु नदी तटे
चर्माक नाम ग्राम राज माणिक भूमिसहस्त्रैरस्टाभि
शत्रुघ्नराजपुत्र कोंडराज विज्ञाप्त्य नानागोत्रचरणेभ्यो ब्राम्हणेभ्य सहस्त्रााय दत्त".[७]

याचा अर्थ असा की प्रवरपुराहून हूकूम देण्यात येतो की वाकाटक कुळातील महाराज प्रवरसेन यांचे हूकूमावरुन शत्रुघ्नराज यांचे पुत्र कोंडराज यांचे विनंती वरुन मधु चंद्रभागा नदीच्या काठचे चर्माक नावाचे गाव त्याखालील सरकारी मापाने ८००० मापे जमिनीसह निरनिराळया गोत्राच्या पुढील एक हजार ब्राम्हणास दान दिली आहे.[८] ते गोत्र म्हणजे गणार्य, शात्यायन, देवार्य, वत्स, कुमारशर्मार्य, रुद्रार्य, सोमार्य, इ. त्यावरील राजमूद्रा अशी होती की

वाकाटकललामत्स क्रमप्राप्तनपाश्रिया
यज्ञ प्रवरसेनस्य शासन रिपुशासनम.[९]

प्रवरपुर राजधानीचे नाव दिसते ते प्रवरसेन राजाच्या नावावरुन पडले आहे ते बहूदा अच्चलपूरलाही म्हटल्या जात असावे. मधु नदी पूर्णेस मिळणारी चंद्रभागा नदी होय. भोजकट राज्य म्हणजे विदर्भ होय. शत्रुघ्नराजपुत्र कोंडराज हा याच वंशातील राजपुत्र असावा. या बरोबरच शिवणीचा ताम्रपट बघितल्यास वरिल विधानाला बळकटी मिळते.

शिवणीचा ताम्रपट–

शिवणी ताम्रपट चम्मक येथील ताम्रपटाच्याच सालचा असून त्यावर राजमुद्र त्याच प्रकारची आहे. त्या ताम्रपटावील मजकूर असा

महाराज श्रीप्रवरसेनस्य वचनात –––––––वेण्णा कर्परमागे
प्रवर्धमानराज्य सवंत्सरे अष्टादशमे फाल्गुण शुध्द
व्दादश्या मौन्दल्सस गोत्राय तैतरीयाध्वर्यवे
देवशर्मार्माचार्या योदकपूर्व सकोरट पंचा पदक ब्रम्हपूर कन्नाम
ग्रामोडातिसुष्ट वटपूरक स्योत्तरेन किणिही खेटक स्यापरेन
पवरज्जावाटकस्य दक्षिणनत कोल्लापूर कस्य पूर्वेण स्वसीमापरिच्छेदेन करंज विरक तटे.
[९]

यात इनाम दिलेल्या ब्रम्हपूर या चतुसिमेची गावे दिली आहे वटपूर हल्लीचे वडगाव किन्हीखेटक म्हणजे कविठा कांडली खोलापूर करंजगाव इ. नावांची गावे वऱ्हाडात

असून ती एलिचपूरच्या आसपास आजही आहेत. व प्रचिण काळात खोलापूर येथे रेशम कापड होत होते. तर करंजगाव जा पितळी घंटया तयार करण्या करीता प्रशिध्द होते. ब्राम्हणवाडा थडी जवळच देऊरवाडा हे प्रचिन काळातील प्रसिध्द ठिकाण आहे. वरिल दोन्ही ताम्रपट बघितल्यास वाकाटक काळात वऱ्हाडात वाकाटकाचे राज्य होते. सिध्द होते त्यावेळी एलिचपूर महत्वाचे ठिकाण होते. किंवा काही काळ अच्चलपूरचे नाव प्रवरपूर असावे असा तर्क करता येण्या सारखा आहे. खालील पुरावे बघितल्यास त्याला बरीच बळकटी मिळते.

विंद्यशक्तीचा मुलगा प्रवरसेन पहिला याने उत्तर महाराष्ट्राचा काही भाग जिकून आपल्या राज्याला जोडून चार अश्वमेघ यज्ञ केले. व स्वत:ला सम्राट ही पदवी धारण केली.[३] हरिवंशातील वर्णणा प्रमाणे पूरीका ही नगरी ऋक्षवंत पर्वताच्या पायथ्याशी वसली होती. ४ विष्णूपूराणात म्हटले की तापी पयोष्णी निर्विन्ध्य प्रमुखा;[१०] म्हणजेच ऋक्षवंत पर्वतातून तापी पयोष्णी निविन्ध्या हया नदया उगम पावतात. वरील पूरावे बघितल्यास ऋक्षवंत पर्वत म्हणजे सातपूडा होय. हे मत बहूतेक विद्ववानानी मान्य केले आहे. तर मग त्याच्या पायथ्याशी पूरीका ही नगरी होती तेच अचलपूर होय. त्याने आपले साम्राज्य चारही दिशानी विस्तारले त्याने ऋक्षंवंत म्हणजेच सातपूडा पर्वताच्या पायथ्याशी पूरीका ही आपली राजधनी केली होती. त्याच्या चार पूत्राना राज्य वाटून दिले होते. वाकाटकांचे दामोदरसेन प्रवरसेन दुसरा नरेन्द्रसेन पथ्वीसेन दूसरा इ. राजे होउन गेले व इ.स.५५० च्या सुमारास वाकाटकांचा वंश नामशेष झाला. तेथे प्रवरसेन राज्य करीत असावा आणि त्याच्या नावारुन प्रवरपूर अचलपूरलाच म्हटल्या जात असावे. विदवांनांनी प्रवरपूर पवनारला म्हटले आहे. परंतु ते खरे नाही. कारण प्रवरसेनाने पूरीका येथून चम्मक ताम्रपट दिला त्या पूरीका या नगरातून दिल्यामूळे त्यावेळी अचलपूर राज्य होते.

ताम्रपटातील उल्लेख प्रवरपूर केला असे स्पष्ट दिसते. आणि म्हणूनच पूरीका आणि प्रवरपूर एकच राजधानीचे शहर असल्याचे दिसते. राष्ट्रकूट यादव बहामनी व इमादशाही व इंग्रज यांच्या काळात एलिचपूर या सर्व शासकाचे मूख्य ठिकाण ठेवले होते. कारण सर्व सोईयुक्त नगर मिळाल्यास त्या ठिकाणी आपली राजधानी बनवित असत. वाकाटकांनी अचलपूरचा विकास घडवून आणला होता आजही वकाटक कालीन रंगमहाल वर्षापूर्वी अस्तित्वात होता असे म्हटल्या जात होते. तो मी स्वत: बघितला आहे. त्या ठिकाणी अचलपूर नगरपरीषदेचे कार्यलय होते. आणि तो भाग भव्य अशा किल्ल्याच एका बाजूला असून स्थानपोथीच्या वर्णनावरून वाकाटक कालीन भव्य सोमनाथाचे मंदिर त्याच भागात असल्याचे दिसते

**कलचुरी घराणे**

वाकाटक साम्राज्याच्या नाशानंतर कलचुरी नृपतीने वऱ्हाडात आपली सत्ता स्थापण केली. यात सशंय नाही. वर्षापूर्वी स्वामीराज नामक राजाचा ताम्रपट नगरधन किंवा नन्दरधन येथे सापडला तो त्या राजाने कलचूरी सवंताच्या ३२२ व सन ५७३–७४ या

वर्षि दिला होता. तेव्हा स्वामीराज हा कलचूरी नृपती कृष्णराज सन ५५०–५७५ याचा मांडलीक होता. ३ त्यानंतर हळू हळू राष्ट्रकुट प्रबळ होउन त्यानी पुढे आपले राज्य स्थापन केले.

राष्टकूट घराणे

राष्ट्रकुट नृपती मूळचे कानडी होते असे समजण्यात येत असे. पण ते चूक असून तेही मूळचे विदर्भातील होते असे अलीकडेच डॉ. वा. वि. मिराशी यांनी आपल्या संशोधनात सिध्द केले आहे. राष्ट्रकूट हा शब्द राष्ट्रीक उर्फ रट्ठ याचा कूट म्हणजे संघ या अर्थाने उत्पन्न झाला असावा. कारण महाराष्ट्रात या रट्ठांची लहान लहान राज्ये पूर्वीपासून होती. तीच पुढे एकत्र येऊन मोठे राज्य झाले असावे. दंतिदुर्ग राजाने इ.स.७५० चे सुमारास राष्ट्रकूट साम्राज्य स्थापन केले. व ते इ.स. ९७७ पर्यंत टिकून होते. यांचे घराणे इ.स.च्या पाचव्या सहाव्या शतकात कर्नाटकातील लातूर (लट्टलूर) या ठिकाणचे. दंतिदुर्ग राजाचा एक पूर्वज दुर्गराज तेथून वऱ्हड प्रंतामध्ये एलिचपूर म्हणजेच अचलपूर तालूक्यात जाऊन राहिला होता. तो एखादया जमीनदार असावा. त्याचा पणतु नन्नराज युधासुर हा प्रथम आपल्या पराक्रमाने इ.स.६५० चे सुमारास मांडलीकाचे पदवीस पोहचला. त्यावेळी त्याची राजधानी अचलपूर होती. वऱ्हाडातील दंतवर्मादीक राष्ट्रकूट राजे चालुक्याचे मांडलीक होते. महसुल गोळा करणे, लढाईच्यावेळी मांडलिक म्हणून जातीने हजर राहणे मुलखात शांतता ठेवणे इ. कामे करीत.

मुलताई व अकोला येथील ताम्रपट देणारा नन्नराज हा चालुक्यांचा मांडलीक असल्याने आपल्या लेखात शक सवंताचा निर्देश करतो. चालुक्य इ.स. च्या आठव्या शतकात नामोहरम होऊन राष्ट्रकूट उदयास आले. इंद्रराज व त्याचा मुलगा दंतिदूर्ग यांनी साम्राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला. कारण या वेळी चालूक्य व पल्लव यांच्यात संघर्ष असल्याने त्या परिस्थितीचा फायदा घेतला. कारण इंद्रराज चालूक्याचा जावई होता. दंतिदूर्गाच्या काळात त्याचे वऱ्हाडातील राज्य मोठे होते. त्याने वयाच्या २५ व्या वर्षी चालूक्य सम्राट किर्तीवर्मा दुसरा याचा पराभव केला. हे त्याच्या इ.स. ७५४ च्या ताम्रपटावरुन दिसते. त्याने पल्लवांशी मैत्री करुन दक्षिण गुजरात, उत्तर व मध्य व महाराष्ट्र, वऱ्हाड व मराठी मध्यप्रांत, माळवा, उज्जयीनी पर्यंत राज्यविस्तार केला. त्याच्या नंतर त्याचा काका कृष्णराज प्रथम गादीवर आला. हे त्याच्या भांदक येथे मिळालेल्या ताम्रपटावरुन दिसते. त्याने चालूक्यांचा पराभव केला.[१४] त्याच्यानंतर गोविंदराज तिसरा याचे ताम्रपट अकोला आणि अमरावती जिल्हयात सापडले आहेत. त्यामध्ये विद्वान ब्राम्हणंना अनेक गांवे दान दिल्याचा निर्देश दिला आहे. त्याचा काळ म्हणजे राष्ट्रकूटांचा वैभवाचा कळस होता. त्याचा मुलगा अमोघवर्ष पहिला याने कान्हेरी येथील लेणी कोरविली असल्याचे दिसून येते. त्यात त्याचे नांव आहे. त्याने कऱ्हाडच्या व दापोली दानपत्रात मान्यखेत शहर वसविल्याचे वर्णन आहे. यानंतर बरेच राजे होऊन गेले.

चतुर्थ गोविंद हा ऐषोआरामी असल्याने याच्या काळात त्याच्या विरुध्द कारस्थाने झाली. अचलपूर येथे राज्य करणारा कर्कर हा प्रमुख होता. त्याची राजधानी अचलपूर जवळ पूर्णानदीच्या काठी कलचुरींच्या सैन्याची मदत असलेल्या चौथ्या गोविंदाच्या सैन्याचे कर्कर व इतर सामंत यांच्यात भयंकर लढाई दहाव्या शतकात होऊन त्यात अमोघवर्षाचा विजय झाला असे राजशेखरच्या “विद्दशालमंजिका” या नाटकावरुन दिसून येते.

राष्ट्रकूट साम्राज्य कमकुवत होताच अनेकांनी बंड उभारलें. राष्ट्रकुटांचे साम्राज्य नष्ट करुन चाल्यूक्य वंशाने आपले साम्राज्य स्थापन केले. याप्रमाणे राष्ट्रकुटांचे राज्य महाराष्ट्रावर सव्वदोनशे वर्ष (इ.स.७५०—९७४) पर्यंत चालले होते. त्यानंतरही नागपूर भागात इ.स.१०८७ पर्यंत चालुक्यांचचे मांडलीक म्हणून राष्ट्रकूटांचे एक राज्य होते असे सीताबर्डीच्या शिलालेखावरुन दिसते. तेथे याच सुमारास धाडिभंडक उर्फ धाडिंल्यदेव हा राजा होता.१

राष्ट्रकूट राजे फार प्रबळ व श्रीमंत आणि भाग्यशाली होते. त्याच्या काळात कोरलेल्या वेरुळच्या लेण्यांवरुन त्याची साक्ष पटते त्यांच्या काळात हिंदू देवतांची मंदिरे व लेण्या कोरण्यात येऊन लागली. तेव्हापासून शंकर, विष्णू यांचे महत्व उत्तरोत्तर वाढत गेले. या काळात अनेक संस्कृत ग्रंथ निर्माण झाले. राष्ट्रकूट नृपतिच्या दोन—तीन ताम्रपटांचा एलिचपूर व त्याच्या परिसराशी प्रत्यक्ष संबंध आला आहे. राष्ट्रकूट नृरपतिच्या काळात अचलपूर व मुलताई यांचा निकटचा संबंध आला होता.

वाकाटकानंतर बदामीच्या चालूक्यांची सत्ता उदयास आली होती. याच घराण्याचा इ.स.७४५ मध्ये किर्तीवर्मण च्या काळात त्याच्या मांडलीकांनी मोठया प्रमाणात बंडखोरी केल्यामूळे चालूक्यांची सत्ता खिळखिळी झाली तेव्हा वेरूळ औरंगाबाद परिसरातील राज्य करणाऱ्या राष्ट्रकूटांनी उघडपणे चालूक्य सत्तेला आव्हाण दिले. आपल्या कार्यक्षेत्रात सार्वभौमत्वाची घोषणा केली. व आपल्या कार्यक्षेत्रात मांडलीकांची नेमणूक केली. ४ राष्ट्रकूट हे प्रथम कलचुरीचे मांडलीक असावे. त्यांनी शक ६१५ सांगलोड आकोला जिल्हा व मुलताई येथे राज्य केले. राष्ट्रकुट घराण्यातील तीन घराण्यांची माहिती उपलब्ध झाली आहे. ती म्हणजे मानपूरचे राष्ट्रकूट दुसरे माल्यखेटचे राष्टकुट तिसरे वऱ्हाडातील नंदिवर्धन येथे राजधाणी करून विदर्भात राज्य केले.१ पूढे सातव्या आठव्या शतकात राष्ट्रकुटानी नंदिवर्धनवरून आपली राजधाणी अचलपूरला आणली तेथूनच दन्तीवर्मा इंद्र प्रथम गोविंदराज प्रथम कर्क प्रथम नन्नराज इ. राष्ट्रकुट राजानी राज्य केले.

राष्टकुट घराण्यातील दोन तीन ताम्रपटांचा अचलपूर व त्याच्या परिसराशी प्रत्यक्ष सबंध आला आहे. त्यातील तिवरखेड ताम्रपट अचलपूराहूनच दिला होता. या ताम्रपटातील निर्देशावरून तत्कालीन राष्टकुट नन्नराज याने अचलपूर येथे आपली राजधानी केली होती. हे स्पष्ट होते. इ.स. १० व्या शतकाच्या आरंभी कर्कर नामक राष्ट्रकूट सामंतांचे राज्य होते. असा उल्लेख सुदी आणि कुडलूर येथे सापडलेल्या

ISSN : 2278-9308
March 2020

ताम्रपटात आला आहे. त्रिपूरी येथील मान्यखेटचे राष्ट्कुट अमोघवर्ष जात असताना त्याचे राष्टकुट कर्कर हयाचेशी पयोष्णी काठी म्हणजे पूर्णच्या काठावर युध्द होउन कर्कराचा पराभव झाला. विन्धशालभंजीका नाटीकेत पयोष्णीच्या युध्दाचा उल्लेख सापडतो. यानंतर उत्तरकालीन चालूक्यांची सत्ता प्रस्थापित झाली.पुढे यादव नृपती सिंघणने हा प्रदेश जिकुंन घेतला त्यानंतर मात्र अचलपूरचे राजवैभव गेले ते पुढे विदर्भाच्या इमाइशाहीच्या स्थापने पर्यत त्याला परत मिळाले नाही. तथापी यादव व बहामनी साम्राज्यात उत्तरेकडील लष्करी ठाणे म्हणून अचलपूरचे महत्व होतेच.

**ईलिचपूरचा (जैन धर्मिय) राजा ईल**

इ.स. १०५८ च्या सुमारास इलिचपूर येथे ईल नावाचा जैन धर्मीय राजा होऊन गेला. राजा ईल आणि त्याचे पूर्वज या संबधी अधिक माहिती मिळू शकत नाही. राजा ईल हा एलिचपूर पासून ७ कि. मी. अंतरावर अचलपूर हरम परसापूर मार्गावर खानजमाननगरचा राहिवाशी होता. [१५] या गावातील अवशेषावरुन ते प्राचीन असल्याचे दिसते. राजा ईल याचे एलिचपूर येथे राज्य होते. त्याने विदर्भात अच्चलपूर येथे राजधानी ठेवून स्वतःहाच्या नावाने ईलिचपूर म्हणून प्रशिध्दीस आणले असावे. त्याचा अपभ्रष होऊन अलसपूर, अळसपूर हे महानूभाव साहित्यात दिसून येते त्याचा अपभ्रष एलिचपूर हे नाव मुस्लीम काळात रुढ झाले असावे. त्याच्या काळात जैन धर्माचा प्रसार झाला. त्यानेच अचलपूरपासून १२ कि. मी. अंतरावर सातपूडयाच्या पर्वतराजीत मुक्तागिरी येथे अनेक जैन मंदिरे बांधली. मुक्तागिरी जैनांचे एक श्रेष्ठ सिद्धश्रेत्र असलेले ठिकाण आहे. आज ही बिलनपूरा येथे घर बांधनीच्या कामात अनेक जैन मूर्ति सापडत आहे यावरून राजा इल जैन असून त्याने अनेक जैन मंदिरे एलिचपूरास बांधली होती हे स्पष्ट होते.

ईलराजाच्या नावावरून हे नाव पडले.[१६] राजा ईल हा जैन धर्मिय होता. धर्मावर त्याचे विशेष प्रेम होते. एकदा त्याचा दरबारात गझनी येथील फकिर फिरत फिरत आला. तो फकिर इस्लाम धर्माचा प्रचारक होता तेव्हा जैन धर्मिय ईल राजाने त्याला जैन धर्माचे तत्वज्ञान सांगितले. आणि आक्रमक असलेल्या इस्लाम धर्माला दूषणे दिली असे म्हणतात.

म्हणून तो फकिर गझनीला गेला. तेथे सुलतान महम्मद गझनीच्या दरबारात उपस्थित राहून त्याने इल राजासोबत वादविवाद झाल्याची घटना सांगीतली. तेव्हा सुलतान महम्मदाचा भाचा रहिमानशहा लग्न सोहळयात मशगूल होता. त्याच वेळी फकिराने त्यला उददेशून म्हटले कि 'तुमच्या धर्माची दुसऱ्या धर्माचे लोक विटबंना करतात आणि तुम्ही लग्नात दंग राहता" अशी शहाजादाची निर्भत्सना केली. त्यामुळे धर्मावर प्रिती असणारा रहिमानशहाने प्रतिज्ञा केली की, मी ईल राजावर स्वारी करुन ठार मारीन तेव्हाच लग्न करीन. म्हणून लग्न सोडून त्याने १२ हजार घोडस्वारासह एलिचपूर वर स्वारी केली. तेव्हा ईल राजानेही सर्व तयारी केली होती. आणि तो बिच्छन नदीच्या काठावर चालून आला. त्याच्यात घनघोर लढाई होऊन या लढाईत

ईलराजा व रहिमानशहा धारातिर्थी पडले. दुला रहिमानशहाचे ११००० सैन्य ठार मारल्या गेले. त्याची एकच कबर बांधन्यात आली. तीच गंजी–ए–शहीदा म्हणून प्रसिद्ध आहे. तर दुल्हा रहिमशहाची कबर विच्छन नदीच्या काठावर बांधून त्यावर अल्लाउद्दीन खिलजीने मोठी इमारत बांधून घेतली. त्याच इमारतीच्या आसपास ईल राजाची कबर आहे. परंतू आज ती ओळखणे कठिण आहे. त्याची माहिती तारीखे अमजदीया या उर्दू ग्रंथात आढळून येते. या घटने पासूनच विदर्भाचे वऱ्हाड नावात रुपांतराची प्रक्रीया सूरु होती. याची सविस्तर माहिती पुढील प्रकरणात येइलच.

१. देशपांडे ग. त्र्य., विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९६७',नागपूर, १९६८ पृ. क्र. १३५
२. मिराशी वा. वि.,सा. प. क्ष. व को. ले. महाराष्ट्रराज्य साहित्य सांस्कृतीक मंडळ, मुंबई १९७९ पृ क्र. ९४
३. कोलते वि. भि. 'प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर', प्रथम आवृत्ती , अमरावती.
४. काळे या, मा. 'वऱ्हाडचा इतिहास', बुलढाणा, १९२४, पृ. क्र. ६०
५. काळे या, मा. 'वऱ्हाडचा इतिहास', बुलढाणा, १९२४, पृ. क्र. ६३–६५
६. मिराशी वा. वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ', पृ क्र. २८
७. काळे या, मा. 'वऱ्हाडचा इतिहास', बुलढाणा, १९२४, पृ. क्र. ६३–६५
८. सहस्त्रबुद्धे पु.ग., महाराष्ट्र संस्कृती प्रथमावृत्ती १९७९ कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे पृ ६४
७. महाजन विद्याधर प्राचीन भारत का इतिहास, एस.चन्द. एण्ड कम्पनी लि. रामनगर नई दिल्ली, पृ. ३६७
८. भूसारी र.म. यादवकालीन महाराष्ट्र पृ. क्र. ५६
९. काळे या, मा. 'वऱ्हाडचा इतिहास', बुलढाणा, १९२४, पृ. क्र. ६३–६५
१०. कित्ता पृ. क्र. ६४
११. मिराशी वा. वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ', पृ क्र. ३०
१२. कोलते वि. भि., आदित्यराजाचा मल्हारा ताम्रपट', सोमवार २२ डिसें. १९७६ दै. तरूण भारत, १३. कोलते वि. भि.' नागपूर. 'स्थान पोथी' एकांक स्थाने पृ. क्र.
१४. अळतेकर अ. स. ' राष्ट्रकूट साम्राज्याचा इतिहास ', पृ क्र. ८
१५. कोलते वि. भि. 'प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर' प्रथम आवृत्ती, अमरावती विद्यापीठ, अमरावती पृ क्र. ६
१६. कुकडे दि. पु. , अयाचित स. मो., संपा, विदर्भ–प्रज्ञा – ८७ भारत इतिहास संकलन योजना, ) पृ. ४४